महाराष्ट्र शासन

"वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे"

# उप वनसंरक्षक, अलिबाग यांचे कार्यालय, अलिबाग

मु.पो.हिराकोट तलावाजवळ अलिबाग ता.अलिबाग जि.रायगड पी.नं. 402 201

दूरध्वनी क्र 02141-222016/222216 Email ID:dycfalibag@mahaforest.gov.in

जावक क्रमांक: ब/20/जमिन/वसं/2407 /2022-23. दिनांक: 18 /10/2022

प्रति,

कार्यकारी अभियंता,
राष्ट्रीय महामार्ग विभाग,
पेण रायगड पिन नं.402 107.

विषयः- **वन जमिन रायगड**

पेण - खोपोली - महड (0.000 कि.मी ते 33.329 कि.मी.) सेक्शन ऑफ एनएच-166 डी मधील रस्त्याचे रुंदीकरणाकरीता वनजमिन मागणी प्रस्ताव ...

संदर्भः- 1) आपले कडील पत्र क्र. रामवि/पेण/प्रशा 5/पेण खोपोली/2106, दि. 08/10/2020
2) या कार्यालयाकडील पत्र क्र.ब/20/जमीन/2154, दि.25/11/2020
3) आपले कडील पत्र क्र.NHD/Pen/PKM/Forest/PB-5/2409 Date-23/11/2020.
4) या कार्यालयाकडील पत्र क्र. ब/20/जमिन/2732, दिनांक 24/12/2020.
5) आपले कडील पत्र क्र. NHD/Pen/PKM/Forest/PB-5/835, दि. 23/04/2021.
6) या कार्यालयाकडील पत्र क्र. ब/20/जमिन/वसं/569, दिनांक 24/05/2021.
7) या कार्यालयाकडील स्मरणपत्र क्र. ब/20/जमिन/वसं/757, दिनांक 03/06/2021.
8) आपले कडील पत्र क्र. NHD/Pen/PKM/Forest/PB-5/1111, दि. 17/06/2021.
9) या कार्यालयाकडील स्मरणपत्र क्र. ब/20/जमिन/वसं/1299, दिनांक 10/07/2021.
10) आपले कडील पत्र क्र. NHD/Pen/PKM/Forest/PB-5/1842, दि. 21/10/2021.
11) या कार्यालयाकडील पत्र क्र. ब/20/जमिन/वसं/4290, दिनांक 28/01/2022.
12) आपले कडील पत्र क्र. NHD/Pen/Forest/PB-5/488, दि. 25/03/2022.
13) या कार्यालयाकडील पत्र क्र. ब/20/जमिन/वसं/1327, दिनांक 06/07/2022.
14) आपले कडील पत्रं क्र. NHD/Pen/Forest/PB-5/1236, दि. 21/07/2022.
15) या कार्यालयाचे पत्र क्र. ब/20/जमीन/वसं/1763, दिनांक 22/08/2022
16) आपले कडील पत्र क्र. राववि/पेण/प्रशा-5/पेण-खोपोली/1433, दि. 29/08/2022

पेण - खोपोली - महड (0.000 कि.मी ते 33.329 कि.मी.) सेक्शन ऑफ एनएच-166 डी मधील रस्त्याचे रुंदीकरणाकरीता वनजमिन मागणी प्रस्तावात आपणाकडील संदर्भिय पत्र क्र. 16 अन्वये पुर्तता अहवाल या कार्यालयास सादर करणेत आलेला आहे.

सदर प्रस्तावाची छाननी केली असता, या कार्यालयाचे संदर्भित पत्र क्र. 15 मधील उपस्थित केलेल्या खालीलप्रमाणे मुददयांची पुर्तता केलेले दिसून येत नाही.

1) या कार्यालयाकडील संदर्भिय पत्र क्र. 13 मधील मुददा क्र 17 मधील प्रस्तावांत 1 ते 57 बाबींची परिपूर्ण चेकलिस्ट सामील करणेबाबत कळविण्यात आले होते, तथापी त्याची पूर्तता करणेत आलेली नाही.

2) या कार्यालयाकडील संदर्भिय पत्र क्र. 13 मधील मुददा क्र 18 चे अनुषंगाने 7/12 उतारे प्रस्तावांत सामील करण्यात करणेंत आले आहे.तरी सदर 7/12 उतारे हे आंग्ल भाषेत भाषांतरित करून प्रस्तावात सामिल करणे आवश्यक आहे.

3) या कार्यालयाकडील संदर्भिय पत्र क्र. 15 मधील मुददा क्र 3 बाबत पुर्तता केलेली नाही. तरी गाव नकाशावरील क्षेत्र विवरण तक्ता विहित प्रपत्रात दिलेले नाही. तसेच आखणी मार्गातील गट नंबरचे सर्व्हे नंबर नमुद केलेले नाही. ते नमुद करणे आवश्यक आहे. व राखीव वनाचे क्षेत्रास कंपार्टमेंट नंबर नमुद केलेले नाही.

4) Index Map 1:50000 या प्रमाणातील नकाशामध्ये आखणी मार्गापासून नजीकचे अभयारण्याचे व पर्यावरण संवेदनशील (ESZ) क्षेत्राचे अंतर स्पष्ट दिसून येत नाही. तरी याबाबत पुर्तता होणे आवश्यक आहे.

5) मौजे कामार्ले ता. पेण येथील KML मध्ये राखीव वनाची हदद व बाधित होणारे क्षेत्र बरोबर दर्शविले नाही. तरी सदर क्षेत्राची सुधारित KML Property File सादर करणे आवश्यक आहे.

6) मौजे आपटी व मौजे डोणवत या गावास गट स्किम योजना लागू नसल्याचे दिसून येत आहे. क्षेत्र विवरण तक्त्यामध्ये गट नंबरचे रकान्यात सर्व्हे नंबर नमुद केले आहेत. याबाबत दुरूस्ती होणे आवश्यक आहे.

वरीलप्रमाणे त्रृटींबाबत आपलेकडील प्रतिनिधी यांना दिनांक 10/10/2022 रोजी समक्ष सांगितले आहे. त्यांनी सदर त्रृटींची पुर्तता 2-3 दिवसात पुर्ण करणेचे आश्वासन दिले होते, तथापी आजमितीपर्यंत आपणाकडून वा आपल्या प्रतिनिधींकडून त्रृटींची पुर्तता न झाल्याने यापत्राव्दारे आपणास प्रस्तावांतील त्रृटी निदर्शनास आणून देण्यात येत आहेत.

तरी वरील प्रमाणे त्रृटींची पूर्तता करुन प्रस्ताव ऑनलाईन व ऑफलाईन प्रस्तावाचा संच तयार करुन या कार्यालयास सादर करणेची कार्यवाही करावी. तसेच ज्या ज्या वन परिक्षेत्रांतून सदर रस्ता जाणार आहे त्या त्या वन परिक्षेत्र अधिकारी यांना त्यांचे परिक्षेत्रांतील आखणी मार्गाची माहिती उपलब्ध करुन देणेबाबत आपणास यापूर्वीच सूचित केलेले आहे. जेणेकरुन त्यांना त्यांचे वनक्षेत्रांत बाधीत होणा-या वृक्षांचे तोडीचे अंदाजपत्रक तयार करुन ते या कार्यालयास सादर करणे शक्य होईल.

(आशिष ठाकरे, भा.व.से.)
उप वनसंरक्षक,
अलिबाग.

प्रतः- सहा. वनसंरक्षक, पनवेल व अलिबाग यांचेकडे माहितीसाठी रवाना.

प्रतः- वन परिक्षेत्र अधिकारी, पेण व खालापूर यांचेकडे माहिती व जरुरत्या कार्यवाहीसाठी रवाना.

2/- त्यांनी उक्त प्रस्तावांमध्ये प्रकल्प यंत्रणेकडून कोणत्याही प्रकारचा वनभंग झाला आहे किंवा कसे? याबाबत खात्री करुन अहवाल सादर करावा. तसेच प्रस्तांवातील वनक्षेत्रांत वृक्षतोड होणार आहे किंवा कसे? याबाबत खात्री करुन वृक्षतोड होणार असेल तर त्याबाबत वृक्षतोडीचे अंदाजपत्रक तयार करुन या कार्यालयास सादर करावा. तसेच प्रस्तूत प्रस्तावांत पर्यायी वनीकरणाकरीता दुप्पट अवनत वनक्षेत्र प्रस्तावीत करुन त्याचे नकाशे, पर्यायी वनीकरणाची योजना, क्षेत्र वनीकरणाकरीता सुयोग्य असल्याबाबतचे प्रमाणपत्र इ. माहिती तात्काळ या कार्यालयास सादर करावी

प्रतः- सर्व्हे कक्ष यांचेकडे माहिती व जरुरत्या कार्यवाहीसाठी रवाना.

\\land3\D\LAND 3\2020-2021\FCA 20-21\Pen - Khopoli Road FCA proposal\Letter.doc